SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २१७ ● पुणे ● गुरुवार, दि. १० जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



श्रीकृष्ण भक्तांनी घेतले भगवान जगन्नाथाचे दर्शन

3



नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना

4

## ठळक बातम्या




### महिला पत्रकारासहीत तिघांना मारहाण

**मंचर (आरंभ पर्व) :** निघोटवाडी हद्दीत अनधिकृत बांधकामाची माहिती घेण्यासाठी गेलेली महिला पत्रकार व इतर तिघांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी बारा जनाविरोधात मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या संदर्भात सुधाकर बाबुराव काळे (रा. मुळेवाडी रोड मंचर) यांनी फिर्याद दिली आहे. शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता निघोटवाडी गावच्या हद्दीत सर्वे नंबर 41/1 मध्ये पांडुरंग सखाराम मोरडे यांनी अनधिकृतपणे पत्राशेड व दुकान बांधले होते. या संदर्भात जमीन मालकांनी पत्रकार स्नेहा बारवे यांना बातमी करण्यासाठी बोलावले होते. स्नेहा बारवे या बातमी करत असताना पांडुरंग सखाराम मोरडे त्याची मुले प्रशांत पांडुरंग मोरडे व निलेश पांडुरंग मोरडे ( सर्व रा. मंचर) तसेच इतर आठ ते नऊ लोक हे त्या ठिकाणी आले. एकत्रित येऊन त्यांनी लाकडी दांडका व प्लॅस्टिकच्या कॅरेटने तसेच लाथा बुक्क्यांनी पत्रकार स्नेहा बारवे, विजेंद्र थोरात, संतोष काळे व फिर्यादी सुधाकर काळे यांना मारहाण केली आहे. यावेळी जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. सुधाकर भाऊराव काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी पांडुरंग सखाराम मोरडे, प्रशांत पांडुरंग मोरडे, निलेश पांडुरंग मोरडे व इतर आठ ते नऊ अनोळखी लोकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बडगुजर करत आहे.


# ‘आरंभ पर्व’ला २०० कोटींचे आमिष

● **फसवणुकीचे आंतरराष्ट्रीय जाळे उघड**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशभरात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ होत असतानाच, पुण्यातील एका नामांकित स्थानिक वृत्तसंस्थेला तब्बल २४.५६ मिलियन अमेरिकन डॉलर्स (सुमारे २०० कोटी रुपये) देण्याचं आमिष दाखवणारा एक बनावट मेल प्राप्त झाला. हा मेल सध्या सोशल मीडिया आणि पत्रकारितेच्या वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

ही घटना “दै. आरंभ पर्व” या स्थानिक दैनिकाच्या अधिकृत ईमेलवर घडली. “Bank of China, Hong Kong” येथील Mrs. Liu Xiuyun या नावाच्या व्यक्तीने स्वतःला प्रायव्हेट बँकिंग विभागातील अधिकारी असल्याचे भासवून हा मेल पाठवला होता. मेलमध्ये सांगण्यात आले की, एका गुंतवणूकदाराचा मृत्यू झाला असून त्याच्या नावावर जमा असलेल्या कोट्यवधी डॉलर्सचा कोणीही नातेवाईक नाही. त्यामुळे मेल पाठवणाऱ्या व्यक्तीने


Liu Xiuyun 8:56 am
to me

From Liu Xiuyun • liuxiuyun11@hotmail.com
To Aarambh Parv - आरंभ पर्व • aparvinfo@gmail.com
Date 10 Jul 2025, 8:56 am
Standard encryption (TLS).
See security details

My name is Mrs. Liu Xiuyun and I am ... of China, here in Hong Kong attached ... Banking Services, I am contacting you ... customer and an investment placed ... management; as a matter of fact, it w... years ago. I would respectfully reques... the contents of this mail private and ... respect the integrity of the informatio... as a result of this email. I contacted you independently and no one is informed of this communication; I would like to intimate you with certain facts that I believe would be of interest to you and benefit the both of us.

At the very beginning of 2015, the subject matter came to our bank to engage in business discussions with our Private Banking Services Department. He informed us that he had a financial portfolio of $19 Million United States Dollars, which he wished to have us turn over (invest) on his behalf. I was the officer assigned to his case; I made numerous

If you find yourself interested to work with me, please do respond to my email positively, then I will initiate this process towards a quick conclusion. It is necessary to inform you that under no condition should you contact me via official channels; I will simply deny knowing you and about this project. I repeat, I do not want you contacting me through our official lines neither do I want you contacting me through my official email account. Contact me only through this email address; I do not want any direct link between you and me. My official lines are not secure lines as they are periodically monitored to ... of customer care in line with our ...nagement policy, do observe this ...ously. Please note that I am a ...married with two children.

...ail not without a measure of fear as ...equences might be, but I know ...othing ventured is nothing gained ...s and riches never come easy or on a platter of gold, this is the one truth I have learned from my private banking clients; do not betray my confidence. If we can be of one accord I shall have the pleasure of meeting you, after this task has been completed.

I await your response with interest, to enable us to proceed with the project.

Yours Sincerely,
Mrs. Liu Xiuyun


### दैनिकाने घेतली तत्पर कृती

**दै. आरंभ पर्व यांनी हा मेल मिळताच कोणताही प्रतिसाद न देता, त्याची सायबर गुन्हे शाखेकडे तात्काळ माहिती देण्याचे काम सुरू केले आहे. यासोबतच, वाचकांसाठी सतर्कतेचा इशारा देत त्यांनी हा प्रकार सार्वजनिक केला.**

दैनिकाच्या प्रतिनिधीस “कागदोपत्री मृत व्यक्तीचा नातेवाईक” दाखवून ही रक्कम अर्धी वाटून घेण्याचा प्रस्ताव दिला.

सायबर सुरक्षेत याला “इनहेरिटन्स स्कॅम” म्हणतात. यात मेल पाठवणारा व्यक्ती बनावट पद्धतीने भावनिक गोष्ट सांगतो आणि शेवटी मोठी रक्कम देण्याचे आमिष दाखवतो. विश्वास संपादन झाल्यावर,

● **आजचे संपादकीय** ●

**‘ई-कोट्यवधींच्या’ आभासी स्वप्नांमागील कटकारस्थान**

“कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी” पैसे, बँक डिटेल्स, पासपोर्ट वगैरे मागितले जातात आणि नंतर संपूर्ण फसवणूक होते.

सर्वसामान्य नागरिकांसाठी इशारा : कोणतीही अनोळखी व्यक्ती जर तुम्हाला कोट्यवधी रुपयांचे आमिष देत असेल, तर ती शक्यता फसवणुकीचीच असते.

तुमच्या वैयक्तिक माहितीची, विशेषतः बँक डिटेल्सची, कोणाशीही शेअर करू नका.

अशा ईमेल्सना ‘स्पॅम’ म्हणून मार्क करा आणि सायबर पोलिसांकडे तक्रार करा.

सायबर पोलिसांचे आवाहन : पुणे सायबर क्राईम शाखेचे एका अधिकाऱ्याने सांगितले की, “अशा मेल्समधून बहुतांश वेळा फिशिंग किंवा आर्थिक फसवणूक केली जाते. लोकांनी सावध राहणे अत्यंत गरजेचे आहे. कोणतीही आर्थिक संधी वाटली तरी आधी सखोल पडताळणी करूनच पुढे पाऊल टाकावे.”

कमळ की घड्याळ?

# संजय जगताप निर्णायक वळणावर

### कार्यकर्त्यांमध्ये मतभिन्नता, गावनिहाय बैठका सुरू

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांच्यासमोर आता ‘कमळ’ (भाजप) की ‘घड्याळ’ (राष्ट्रवादी - अजित पवार गट) हे निवडण्याचा मोठा पेच निर्माण झाला आहे. कार्यकर्त्यांच्याच दबावामुळे ते पक्षबदलाच्या निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहेत. त्यांच्या भवितव्याबाबतची चर्चा सध्या तालुकाभर तापली आहे. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी गावनिहाय बैठका घेतल्या जात आहेत. गेल्या काही महिन्यांत अनेक मातब्बर नेते भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या भाजप प्रवेशानंतर संजय जगताप यांच्या कार्यकर्त्यांमध्येही चळवळ वाढली. सत्ता हेच राजकारणाचे अंतिम सत्य आहे, या भावनेने अनेक कार्यकर्त्यांनी थेट संजय जगताप यांच्यावर पक्षबदलासाठी दबाव टाकला. "जर तुम्ही निर्णय नाही घेतला, तर आम्ही मोकळे" अशा शब्दांत कार्यकर्त्यांनी आपली नाराजी व्यक्त करत संजय जगताप



● **पक्षबदलाच्या तयारीत संजय जगताप?**

यांना स्पष्ट संदेश दिला. तालुक्यात दोन वेगवेगळे मतप्रवाह आहेत - काहीजण अजित पवार गटातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाजूने आहेत, तर बहुसंख्य कार्यकर्त्यांचा कल भाजपकडे आहे. विशेषतः हवेली आणि पुरंदरमधील भाजप कार्यकर्त्यांचा पाठिंबा, तसेच संघ परिवाराशी असलेले जुने संबंध हे संजय जगताप यांच्या निर्णयात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

## हिंजवडीतील वाहतूक कोंडीबाबत आज मुंबईत उच्चस्तरीय बैठक

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

हिंजवडी आयटी पार्क परिसरात रोज होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येकडे राज्य शासनाने लक्ष दिले आहे. आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत हा मुद्दा मांडल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, गुरुवारी (दि. १०) मुंबईत उच्चस्तरीय बैठक आयोजित केली आहे. ही बैठक दुपारी १:४५ वाजता विधानभवनात होणार असून, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत दोन्ही उपमुख्यमंत्री, नगरविकास राज्यमंत्री, आमदार शंकर जगताप आणि महेश लांडगे, पुण्याचे जिल्हाधिकारी, पुणे व पिंपरी - चिंचवड महापालिकांचे आयुक्त, पीएमआरडीएचे आयुक्त, पिंपरी - चिंचवड पोलिस आयुक्त, महामार्ग-मेट्रो आणि एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत



हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रमुख रस्त्यांचा विस्तार, नवीन जोडरस्त्यांची निर्मिती, उड्डाणपूल व पूल प्रकल्प, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार आणि पार्किंगची अंमलबजावणी यावर चर्चा केली जाणार आहे.

***मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने बैठक आयोजित केली आहे. नागरिकांना या बैठकीतून ठोस निर्णय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वाहतूक नियोजनाबाबत प्रभावी निर्णय घेतले गेले, तर हिंजवडी परिसरातील हजारो आयटी कर्मचारी, रहिवासी आणि वाहनचालकांसाठी दिलासा मिळणार आहे. - शंकर जगताप, आमदार***

## गुरुपौर्णिमेच्या दिवशी आनंदाश्रमात शिवसेनेचा मेगा पक्षप्रवेश

● **'प्रॉमिसिंग पुणे'चा संकल्प करत चळवळीतील कार्यक्षम कार्यकर्त्यांचे 'ऑपरेशन टायगर' यशस्वी होणार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्रित मेळाव्यानंतर होणाऱ्या राजकीय परिणामाची राज्यभर उत्सुकता असतानाच पुण्यातील विविध संस्था, संघटना, गणेशोत्सव मंडळांत कार्यरत शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून ठाण्यातील स्वर्गीय आनंद दिघे यांच्या टेंभीनाका येथील आनंदाश्रमात हा मेगा पक्षप्रवेश सोहळा रंगणार आहे. खुद्द एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश होणार आहे. सकारात्मक आणि रचनात्मक काम करत आपली रेष मोठी करण्यात माहीर असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने ही अनोखी रणनीती अंमलात आणली आहे.



'प्रॉमिसिंग पुणे'चा संकल्प करीत वंदेमातरम संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष, ग्लोबल गणेश फेस्टिव्हलचे कार्यकारी अध्यक्ष, '#व्हायरल_माणुसकी' पुस्तकाचे लेखक, वक्ते आणि निवडणुक व्युहरचनेसाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द असलेले वैभव वाघ यांच्यासह पतित पावन संघटनेचे शहराध्यक्ष स्वप्निल नाईक, गेली ३० वर्षे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करणारे अनुभवी क्रिडासंघटक उमेश गालिंदे, आरोग्य क्षेत्रातील कामासाठी वस्ती भागांमध्ये 'हक्काचा कार्यकर्ता' अशी प्रतिमा असलेले अभिमन्यू मैद आणि सुधीर ढमाले, हॉटेल कामगारांच्या न्याय हक्कसाठी कार्यरत असलेले संदेश पावसकर, विद्यार्थी चळवळीतील युवा कार्यकर्ते अथर्व पिसाळ, ७५००० किलो गोमांसाची तस्करी रोखल्यामुळे महाराष्ट्रात गाजलेले निलेश जाधव, स्वत: कॅन्सरशी यशस्वी दोन हात केल्यानंतर आता पूर्णवेळ कॅन्सर रुग्णांसाठी मोफत समुपदेशन करणारे कॅन्सरयोध्दा युनुस सय्यद, सतिश शिंदे, मातंग समाजाच्या युवक चळवळीत प्रसिध्द असलेले विजय गालफाडे, युवा उद्योजक दत्ता मानकर, माजी नगरसेवक अनिल बटाणे, देवेंद्र शेळके, गोरख बांदल, गौरव नवले, अनिकेत उतेकर, ओंकार मालुसरे, महेश चव्हाण, योगेश राजपुत, महेश सुर्यवंशी यांचा समावेश आहे. विद्येचे माहेरघर आणि सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरातून या अष्टपैलू टीमच्या प्रवेशाचे 'ऑपरेशन टायगर' घडवून आणण्यासाठी शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना सचिव संजय मोरे, उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना शहरप्रमुख प्रमोद भानगिरे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

# त्रिभुवन सहकारी विद्यापीठ स्थापनेचा महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय : साहेबराव खामकर

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व) :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ हा संयुक्त राष्ट्रांचा एक उपक्रम आहे.

या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून केंद्र सरकारने एक ऐतिहासिक महत्त्वाचे क्रांतिकारक पाऊल उचलले असून देशातील पहिल्याच त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे.देशातील विविध सहकारी संस्थांमध्ये पात्र व सक्षम मनुष्यबळ ऊपलब्ध होण्याच्या  दृष्टीने या त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची फार मोलाची मदत होणार आहे.भारत देशामध्ये सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्था असून त्या मध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या एक कोटीहुन अधिक लोक जोडले गेले आहेत. सहकारा मुळे ग्रामीण भागातील जनजीवनाचा कायापालट झाला असून रोजगार, शिक्षण, आरोग्य,व्यवसाय इ.मध्ये मोठ्या प्रमाणात संधी ऊपलब्ध झाल्या आहेत. या सहकारी संस्थांमध्ये साखर कारखाने, बँका , सुत गिरणी आदींचा समावेश असून विशेषतः साखर कारखान्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागा मध्ये  मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध करून देण्यात येऊन आर्थिक सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत आहे.

महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात साखर कारखाने ऊभारण्याची कल्पना सन १९१२ मध्ये एस हिरेमठ व बी सहस्रबुध्दे यांनी मांडली व सहकारी क्षेत्रात

साखर कारखाना उभारण्याचे काम सहकार तज्ञ लल्लुभाई सामळदास व सहस्रबुध्दे यांनी सन १९१८ मध्ये केले आहे आणि दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना हा पुणे जिल्ह्यातील बारामती येथे स्थापन झाला.परंतु ऊसा अभावी तो कारखाना सन १९२४ मध्ये बंद पडला. सन १९३२ मध्ये ब्रिटिश सरकारने साखर कारखानदारीस करविषयक संरक्षण दिल्यामुळे या कायद्याचा आधार घेऊन सहकारी तत्त्वावर भारतात सन १९३३ साली चार कारखाने सुरू झाले.त्या पैकी आंध्र प्रदेशात इरिकोपड्डा येथे त्या वेळी रावबहादूर सी.एस.नरसिंहराव यांनी सहकारी तत्वावरील प्रति दिन ७५ मे.टन गाळप क्षमता असलेला स्थापन केलेला कारखाना आजही चालू आहे.स्वातंत्र्योत्तर काळात आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना लोणी,प्रवरानगर येथे सन १९५० मध्ये स्थापन करण्यात आला. भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात सहकारी साखर कारखान्यांचे मोठे योगदान आहे.आज देशाच्या साखर उत्पादनात सहकारी साखर कारखान्यांचा वाटा अंदाजे ३५% च्या दरम्यान आहे. देशातील सहकारी साखर कारखान्यांची संघीय संस्था म्हणून सन १९६० मध्ये स्थापन झालेली नॅशनल फेडरेशन ऑफ को ऑपरेटीव्ह शुगर फॅक्टरीज् लि . ही संस्था सहकारी साखर कारखान्यांना गाळप क्षमता विस्तार, आधुनिकीकरण, धोरणात्मक बाबी आदि विषयांवर मार्गदर्शन करीत असते. संपूर्ण भारतात सुमारे दोनशे पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने असून त्याचा थेट फायदा पन्नास लाख पेक्षा अधिक शेतक-यांना होत आहे.तसेच सुमारे पाच लाख लोकांना रोजगार मिळवून दिला आहे. ग्रामीण समुदयांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी सहकारी साखर क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका राहीली आहे. साखर ऊद्योग म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राची लाईफ लाईन आहे.सहकार चळवळ निकोप,शुध्द ,निर्धोक व सुरक्षित रहाणे गरजेचे आहे. अज्ञान आणि बेईमानी यामुळे सहकारी संस्था अडचणीत येतात. या साठी विना सहकार नही ऊध्दार या बरोबरच बिना संस्कार नही सहकार याची जोड द्यावी लागेल.सहकाराला खाजगी बरोबर स्पर्धा करावी लागेल.त्या करीता सहकाराचा अभ्यास, आर्थिक शिस्त व व्यवहार्रता असणे खुपच गरजेचे आहे. आता सहकार चाचपडायला लागला आहे,असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सहकारी साखर कारखाने निर्णायाक टप्प्यावर ऊभे असतांनाच अशातच केंद्रात सहकार खात्याची निर्मिती झाली व पाठोपाठ त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना झाली,ही खरोखरीच सहकाराच्या दृष्टीने अतिशय मोलाची बाब आहे.या मुळे सहकारी चळवळीला बळकटी येईल. सहकार हा उत्सव झाला पाहिजे.भारतातील लोकांनी आपली प्रगती करून घेण्यासाठी सहकाराची कास धरणे जरूरीचे असून ही काळाची गरज आहे.सहकारी चळवळ ज्या तत्वावर आधारलेली आहे,त्या तत्वांची कल्पना आल्यावर सहकारी तत्वावर कार्य करणा-या  व्यक्ती एकत्र येऊन कार्य करण्यास प्रारंभ केल्यानंतर त्यांचे अस्तित्व कायद्याने मानले पाहिजे म्हणून महाराष्ट्र    सहकारी संस्था कायद्याची तरतूद करण्यात आली.सहकारी चळवळीची वाढ वेगाने झाली. ज्या वेळी एखाद्या चळवळीची वाढ वेगाने होते त्या वेळी त्यात चांगल्या बरोबर वाईट प्रवृत्तीही शिरतात. या मुळे सहकार चळवळ बदनाम होऊ लागली  आहे.सहकार चळवळ वास्तविक ऊत्सफुर्त चळवळ असावी. ही व्यक्तीची व त्या बरोबर समाजाची चळवळ असावी. सहकार म्हणजे ज्या मध्ये सर्वांचे सहकार्य असते त्या मध्ये गरीब श्रीमंत,लहान मोठा भेद नाही.सहकारी चळवळ ही लोकशाहीची चळवळ आहे. सर्व निर्णय चर्चेने होणे आवश्यक आहे.चर्चा म्हणजे चढाओढ नव्हे.संस्थे विषयी तळमळ, प्रामाणिकपणा हे देशहिताचे दृष्टीने आवश्यक आहे.

अशा प्रकारे सर्व सहकारी संस्था सुस्थितीत चालण्या करिता त्या संस्थे मध्ये कुशल व  प्रशिक्षित मनुष्यबळ असणे गरजेचे आहे कारण कालानुरूप नियम, कायदे,तंत्रज्ञान बदललेले जाते. आधुनिकीकरण  होत असते.त्या दृष्टीने आवश्यक ते कुशल व पात्र मनुष्यबळ उपलब्ध होणेचे दृष्टीने त्रिभुवन सहकारी विद्यापीठा मध्ये शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन इ.सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत व तेथून शिक्षण घेऊन वेगवेगळ्या सहकारी संस्थांना प्रशासकीय, तांत्रिक,पर्यवेक्षी  अशा विविध प्रकारचे मनुष्यबळाचा पुरेसा व दर्जेदार पुरवठा होईल व संस्था पुर्ण कार्यक्षमतेने चालतील व आर्थिक सक्षम होतील. या विद्यापीठा मध्ये संचालक मंडळासाठी देखील प्रशिक्षणाची सोय असणे जरुरीचे आहे की जेणेकरून संचालक मंडळ देखील सक्षम पणे कार्यरत राहील व संस्था व्यावसायिक पध्दतीने चालविल्या जाऊन उद्दिष्ट पुर्ती साठी प्रयत्नशील राहील.देशात पहिल्यांदाच सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासा साठी सहकार विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामीण व्यवस्थापन संस्था, आणंद (गुजरात) IRMA ला भारतातील पहिले सहकार विद्यापीठ म्हणून रुपांतरीत करण्यात आले आहे.हे विद्यापीठ पहिल्या वर्षापासून दरवर्षी आठ लाख सहकारी व्यावसायिकांना प्रशिक्षण देईल.सहकारसे समृद्धी या सरकारच्या दृष्टीकोनाला समर्थन देत तांत्रिक आणि व्यवस्थापन शिक्षणावर भर देणार आहे. संशोधन, नवोपक्रम आणि सहकार विकासाला चालना देण्यात येणार आहे. केंद्र सरकार विद्यापीठाच्या शासन व्यवस्थेवर देखरेख ठेवेल, कुलगुरू नियुक्त करील आणि ऊच्च शैक्षणिक दर्जा सुनिश्चित करील.जागतिक दर्जाचे शिक्षण आणि कौशल्य विकास प्रदान करून सहकार क्षेत्राला कार्पोरेट क्षेत्राशी स्पर्धात्मक बनविण्याचे उदिष्ट विद्यापीठाचे आहे.हे विद्यापीठ जागतिक सहकारी शिक्षणाच्या नवीन मापदंडाची स्थापना  करेल आणि भारतातील सहकारी चळवळीला आणखी मजबूत करेल. त्या ठिकाणी  डिग्री, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्स  चालविले जातील.या मधून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना म्हणजेच खरोखरीच हे सहकाराच्या दृष्टीने मोठे क्रांतिकारक पाऊल ठरणार असल्याचे मत साहेबराव खामकर साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख,सहकार भारती यांनी दिले.


# ‘ई-कोट्यवधींच्या’आभासी स्वप्नांमागील कटकारस्थान



**"तुम्ही २५ मिलियन डॉलर्सचे वारसदार आहात!"** असा मेल तुमच्या इनबॉक्समध्ये आला, तर क्षणभर डोळे विस्फारले जाणे स्वाभाविक आहे. पुण्यातील एका माध्यम संस्थेला आलेला असाच मेल सध्या चर्चेचा विषय ठरतोय. २०० कोटी रुपयांची अमिषं, एका अनाम गुंतवणूकदाराची बनावट गोष्ट, आणि 'आपण त्याचे वारसदार आहोत' हे सिद्ध करून अर्धी रक्कम उचलण्याचा प्रस्ताव – हे सर्व केवळ 'फसवणुकीच्या साखळीचा' एक नमुना आहे.

ही घटना केवळ एक इमेल स्कॅम नाही, तर लोकांच्या भावनांशी खेळणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळ्यांचे वास्तव अधोरेखित करते. यामध्ये प्रामाणिक नागरिक, संस्था आणि लहान व्यावसायिकांना लक्ष्य केले जाते. कुणीही ‘गुगल’वर शोध न घेताच, मेल पाठवणाऱ्याचे “बँक ऑफ चायना” सारख्या नावांवर अंधविश्वास ठेवतो आणि हीच घातक सुरुवात होते.

**फसवणुकीच्या गोष्टींचा एक ठराविक 'पॅटर्न'**
**मेल मध्ये एक भावनिक कथा – मृत ग्राहक, नातेवाईक नाहीत, अमाप संपत्ती.**
**मेल पाठवणारी व्यक्ती “फक्त तुमच्यावर विश्वास” टाकते.**
**मेलचा शेवट – "ही संधी तुमच्या आयुष्याचे चित्र बदलू शकते."**


Liu Xiuyun 8:56 am
to me
From Liu Xiuyun • liuxiuyun11@hotmail.com
To Aarambh Parv – आरंभ पर्व • aparvinfo@gmail.com
Date 10 Jul 2025, 8:56 am
Standard encryption (TLS).
See security details

My name is Mrs. Liu Xiuyun and I am of China, here in Hong Kong attached Banking Services, I am contacting you customer and an investment placed u management; as a matter of fact, it w years ago. I would respectfully reques the contents of this mail private and a respect the integrity of the informatio as a result of this email. I contacted you independently and no one is informed of this communication; I would like to intimate you with certain facts that I believe would be of interest to you and benefit the both of us.

At the very beginning of 2015, the subject matter came to our bank to engage in business discussions with our Private Banking Services Department. He informed us that he had a financial portfolio of $19 Million United States Dollars, which he wished to have us turn over (invest) on his behalf. I was the officer assigned to his case; I made numerous

If you find yourself interested to work with me, please do respond to my email positively, then I will initiate this process towards a quick conclusion. It is necessary to inform you that under no condition should you contact me via official channels; I will simply deny knowing you and about this project. I repeat, I do not want you contacting me through our official lines neither do I want you contacting me through my official email account. Contact me only through this email address; I do not want any direct link between you and me. My official lines are not secure lines as they are periodically monitored to of customer care in line with our nagement policy, do observe this ously. Please note that I am a married with two children.

ail not without a measure of fear as equences might be, but I know othing ventured is nothing gained s and riches never come easy or on a platter of gold, this is the one truth I have learned from my private banking clients; do not betray my confidence. If we can be of one accord I shall have the pleasure of meeting you, after this task has been completed.

I await your response with interest, to enable us to proceed with the project.

Yours Sincerely,
Mrs. Liu Xiuyun



या सगळ्यामागे एकच उद्देश – तुम्हाला भावनिक आणि आर्थिक जाळ्यात ओढून तुमचे पासपोर्ट, बँक डिटेल्स, आधार, OTP मिळवणे. अनेक वेळा 'कागदपत्र प्रक्रिया शुल्क'च्या नावाखाली लाखोंचा गंडा घालतात.

**या प्रकरणातून शिकण्यासारखे :** दैनिक आरंभ पर्वने या प्रकाराची तत्परतेने दखल घेतली आणि यासंदर्भात सायबर गुन्हे शाखेशी संपर्क केला. हे अनुकरणीय आहे.

अनेक व्यक्ती किंवा संस्था, आपल्या प्रतिष्ठेच्या भीतीने अशा गोष्टी गुपित ठेवतात. पण ही गोष्ट जाहीर करून, त्यांनी इतर संस्थांना जागरूकतेचा संदेश दिला.

**माध्यमांची जबाबदारी आणि सामान्य नागरिकांची सजगता :** आज 'फेक न्यूज', 'फेक मेल्स', 'फेक ऑफर्स' यांचा सुकाळ आहे. माध्यमांची जबाबदारी इतकीच नाही की बातमी द्यायची, तर समाजाला सजग करणे हाही त्यांच्या कामाचा भाग आहे. त्यामुळे अशा मेल्सच्या पाठीमागे असलेल्या कटाचा पर्दाफाश करणं गरजेचं आहे.

**सामान्य नागरिकांनीही यापासून शिकावं :** अनोळखी मेल्स आणि त्यांच्या लिंकवर क्लिक करू नका.

कोणतीही माहिती 'क्रॉस-व्हेरिफाय' करा – बँकेच्या किंवा अधिकृत वेबसाइटवरून.

सायबर क्राईमशी संबंधित तक्रार www.cybercrime.gov.in या पोर्टलवर नोंदवा.

**शेवटी – विश्वास ठेवा, पण शहाणपणात!**

आजचा जमाना “डिजिटल इंडिया” चा आहे. परंतु डिजिटल जगतातील यशस्वी प्रवासासाठी, सतर्कतेचा कवच घेऊनच पाय ठेवावा लागतो. कारण एक चुकीचा क्लिक, लाखो रुपयांची चूक ठरू शकते.

# नऱ्हेत रस्त्यावर खड्ड्यात पडला आणि निष्पाप व्यक्तीचा बळी गेला!

## मनपा प्रशासनाची हलगर्जीपणा कारणीभूत ठरल्याची नऱ्हेकर नागरिकांची भावना

- **सदर व्यक्तीला नुकसान भरपाई द्या**
- **संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करा अन्यथा पुणे महानगरपालिकेला टाळे ठोकणार : भूपेंद्र मोरे**



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

समाविष्ट गाव असलेल्या नऱ्हे परिसरातील नागरिकांना विविध समस्येचा सामना करावा लागत आहे त्यात एक दुःखद घटना घडली की नऱ्हे येथे राहणारे श्री. सचिन हंगे हे बंडोजी खंडोजी चव्हाण महाविद्यालय येथे शिक्षक या पदावर कामाला होते

नाव कै. सचिन हंगे बंडोजी खंडोजी चव्हाण महाविद्यालय येथे शिक्षक या पदावर कामाला होते. नोकरीनिमित्त नऱ्हे धायरी फाटा रस्त्यावर दुचाकीवरून पडले. आणि डोक्यावर मार लागल्यामुळे त्यांना प्रचंड रक्तस्त्राव झाला. त्यांना डॉ. किरण भालेराव यांनी घटनास्थळावरून उचलून प्राथमिक उपचार दिले. काही दिवस उपचारानंतर त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले त्यांचे आज दुःखद निधन झाले..

या घटनेमुळे नऱ्हे व परिसरात शोककळा पसरली आहे. घरातील एक कमावता पुरुष प्रशासनाच्या चुकीचा बळी ठरल्याची कुजबुज सुरू आहे.

नऱ्हे परिसरातील रस्त्यावरील खड्डे बुजवा ह्या साठी भूपेंद्र मोरे व नऱ्हेकर नागरिक वारंवार प्रशासनाकडे मागणी केली होती. मात्र प्रशासनाने हलगर्जीपणा करून फक्त अर्धे काम केले.

त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळेच हा एका निष्पाप व्यक्तीचा मृत्यू झाल्याची संतप्त भावना नऱ्हेकरानी व्यक्त केली आहे

या भागातील सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी अत्यंत कठोर शब्दांमध्ये पुणे महानगरपालिकेचा निषेध व्यक्त केला आहे.

नऱ्हेकर नागरिकांची समस्या आग्रहाने मांडत असतानाही पुणे महानगरपालिका यांनी दिरंगाई पणा केल्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे.

त्या व्यक्तीला नुकसान भरपाई द्या! अन्यथा पुणे मनपाला टाळे ठोकण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी दिला आहे.

> **सदर व्यक्ती हे आमच्या हॉस्पिटल समोरील रस्त्यावर दुचाकीवरून पडले. त्यावेळी त्यांच्या कानातून प्रचंड रक्तस्त्राव होत होता त्यांना प्राथमिक उपचार केले केले. व पोलिसांच्या मदतीने पुढील उपचारासाठी नेण्यात आले.**
> **- डॉ. किरण भालेराव**
> **प्रत्यक्षदर्शी**

> **आम्ही पुणे महानगरपालिकेला रस्त्यावरील खड्डे बुजण्या साठी वारंवार आवाहन केले. मनपा प्रशासनाने कामसुकारपणा केल्याचे यामध्ये दिसून येते त्यामुळे त्या मृत व्यक्तीच्या कुटुंबाला महानगरपालिकेकडून आर्थिक मदत करण्यात यावी. घटनेसाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांचे त्वरित निलंबन करा अन्यथा महानगरपालिकेच्या मुख्य गेटला आम्ही कुलूप लावणार आहोत.**
> **- भूपेंद्र मोरे**
> **सामजिक कार्यकर्ते**



## अद्वैत साळूंके यास १८व्या राज्यस्तरीय स्विमिंग स्पर्धेत सुवर्ण पदक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील अमानोरा स्कूलचा इयत्ता सहावीचा विद्यार्थी अद्वैत साळुंखे याने राज्यस्तरीय पोहण्याच्या स्पर्धेत उजवा कामगिरी करत शाळेचे आणि शहराचे नाव उज्वल केले आहे. पुणे डिस्ट्रीक्ट ॲमेच्योर ॲक्वेटिक असोसिएशन आयोजित १८व्या राज्यस्तरीय स्विमिंग स्पर्धा (State Level Swimming Competition) मध्ये अद्वैतने अंडर-१२ गटात सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अद्वैतने १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये सुवर्ण पदक आणि १०० मीटर फ्रीस्टाईल मध्ये कांस्य पदक पटकावले. त्याच्या या कामगिरीबद्दल त्याला पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तसेच उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. अमानोरा स्कूल विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देत त्यांना विविध क्षेत्रांमध्ये प्रोत्साहन देण्याबाबत नेहमीच अग्रेसर राहिली आहे. केवळ अभ्यासातच नव्हे तर खेळ, कला आणि इतर उपक्रमांतही विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शाळेची भूमिका मोलाची आहे. अद्वैतच्या या यशाने हीच परंपरा पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

# सोनालिकाने सर्वाधिक ४३,६०३ ट्रॅक्टरची केली विक्री



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेला सोनालिका ट्रॅक्टर्स शेतकऱ्यांच्या अधिक उत्पादकता व समृद्धीसाठी आपल्या शक्तिशाली आणि ट्रॅक्टरद्वारे उद्योगात नवनवीन विक्रम प्रस्थापित करण्यासाठी ओळखली जातो. या दृष्टिकोनामुळे कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत एकूण ४३,६०३ ट्रॅक्टर विक्रीसह विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. ही कंपनीची पहिल्या तिमाहीतील आजवरची सर्वाधिक विक्री आहे. ही मोठी झेप म्हणजे प्रत्येक शेतकऱ्यासाठी हेवी ड्यूटी ट्रॅक्टर्सद्वारे 'दम आगे बढ़ने का' या ब्रँडच्या वचनाला जागण्यासोबतच २०-१२० एचपी ट्रॅक्टर श्रेणीत अद्ययावत तंत्रज्ञान आणि मजबूत अभियांत्रिकी क्षमतेचा पुरावाच आहे. देशभरात मान्सूनचे आगमन झाल्यामुळे खरीप हंगामाची पेरणी गतवर्षीच्या तुलनेत लक्षणीयरीत्या वाढली आहे. सोनालिका कंपनी प्रत्येक शेतकऱ्याला त्यांच्या पिक आणि जमिनीनुसार योग्य ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्यासाठी बांधील आहे. कंपनीकडे ४०० हून अधिक अनुभवी अभियंते असून ते शेतकऱ्यांच्या प्रत्येक बारीकसारीक सूचनांनुसार आधुनिक व तंत्रज्ञानाने सुसज्ज ट्रॅक्टरची रचना करतात. सोनालिकाचा प्रत्येक हेवी ड्यूटी ट्रॅक्टर हा सर्वोच्च दर्जाच्या कसोटीवर तो उतरावा यासाठी अत्याधुनिक रोबोटिक्स व ऑटोमेशन तंत्रज्ञानाने विकसित केला जातो. कंपनीच्या पंजाबमधील होशियारपूर येथील जगातील क्रमांक एकच्या संपूर्णतः एकत्रित ट्रॅक्टर निर्मिती केंद्रात दर २ मिनिटांनी एका नवीन ट्रॅक्टरचे उत्पादन करण्यात येते. या कामगिरीबद्दल मत व्यक्त करताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, “आमच्या ‘दम आगे बढ़ने का’ या वचनानुसार आम्ही नेहमीच प्रत्येक शेतकऱ्याच्या प्रगतीसाठी कार्य करत आलो आहोत. आमच्या हेवी ड्यूटी ट्रॅक्टर्सच्या माध्यमातून आम्ही ते वचन पूर्ण करतो. त्यातूनच आम्ही पहिल्या तिमाहीतील विक्रमी अशा आजवरच्या सर्वाधिक ४३,६०३ ट्रॅक्टर विक्रीपर्यंत पोहोचलो आहोत, याचा आम्हाला आनंद आहे. यामध्ये आमचा जून महिन्याची आतापर्यंतची सर्वाधिक कामगिरीही समाविष्ट आहे.

या वर्षीच्या मान्सूनमुळे शेतकऱ्यांमध्ये अगोदरच सकारात्मकता आली असून विक्रमी खरीप पेरणी आणि पिकाच्या आशादायक अंदाजामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे.

आमचे ‘शेतकरी-प्रथम’ हे मूल्य कायम ठेवत तंत्रज्ञान व नवकल्पनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक व दीर्घकालीन बदल घडवून आणण्यासाठी आम्ही पुढेही कार्यरत राहू.”


# थोडक्यात




## धर्माभिमानी पुण्याचा हुंकार! हिंदू समाजाचा जाहीर निषेध मोर्चा

**पुणे (आरंभ पर्व) : सांगलीतील ऋतुजा पाटील या धर्माभिमानी मुलीला ख्रिश्चन धर्मातल्या राजगे कुटुंबीयांनी हिंदू असल्याचे भासवून लग्न केले. विवाहानंतर चर्चमधील फादरच्या सांगण्यावरून तिच्यावर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यासाठी प्रचंड मानसिक छळ झाला. सात महिन्यांची गरोदर असताना या छळाला कंटाळून ऋतुजाने गळफास घेऊन आत्महत्या केली. या दुर्दैवी आणि संतापजनक घटनेच्या विरोधात पुण्यात दिनांक ८ जुलै रोजी हिंदू समाजाच्या वतीने भव्य निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला.धर्मांतरास आळा बसावा यासाठी कठोर कायदा व्हावा तसेच दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.**

## कोल्हेवाडी किरकटवाडी स्टेट लाईटचे काम पूर्ण करा : दत्ताभाऊ कोल्हे



**खडकवासला (आरंभ पर्व) : कोल्हेवाडी. किरकटवाडी परिसरामध्ये मागील काही दिवसापासून स्टेटलाईन पोलचे काम करण्यात आले आहे. मात्र त्या पोलवरती बल्प बसवले नाहीत .त्यामुळे रस्त्यावरती अंधार पसरून वाहतुकीला व येणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे. या स्टेटलाईटचे पोल काम पूर्ण करून नागरिकांची सोय करावी अशी मागणी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांनी केली आहे. कोल्हेवाडी किरकट वाडी गावामध्ये नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या भागातील सर्वच रस्त्यावर नागरिक व वाहने यांची रहदारी आहे. त्यामुळे ह्या सर्व रस्ते हे प्रकाशमय असणे गरजेचे आहे. शिवाय या भागामध्ये महिला वर्गाचे ही प्रमाण जास्त आहे. याशिवाय भटके कुत्रीही यांचाही भागात वावर आहे. त्यामुळे रस्त्यावरील स्टेट लाईट चालू करणे गरजेचे आहे. त्यासाठी ही लाईन पूर्ण करावी अशी मागणी दत्ताभाऊ कोल्हे यांनी केली आहे या मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा दत्ताभाऊ कोल्हे यांनी दिला आहे. या परिसरातील विविध घटना व अनुचित प्रकार पाहता या स्टेट लाईनचे काम लवकर होण्याची गरज आहे.**

## उर्मिला येवले यांचे निधन



**राजगुरुनगर (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील उर्मिला शामराव येवले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ७२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, एक विवाहीत मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील तिळवण तेली समाजाचे कार्यकर्ते राजेश आणि हुतात्मा राजगुरू भाजीपाला मंडईचे पदाधिकारी निलेश व योगेश येवले यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या अंत्ययात्रेस मोठा जनसमुदाय उपस्थित होता.**

# पुण्यात युवा शेतकरी संघाचे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

## २ हजार महिलांना छत्री वाटप : जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहणार; रोहिदास (बापू )चोरगे







**पुणे (दै. आरंभ पर्व)**

युवकांनी जनतेशी थेट संपर्क साधत समाजहिताचे कार्य पुढे नेणे ही काळाची गरज आहे. महिला सन्मान आणि समाज प्रबोधनासाठी युवा शेतकरी संघाचे हे पाऊल कौतुकास्पद असून, अशा कार्यातूनच समाजात सकारात्मक बदल घडतो, मी समाजाचा आहे समाज माझ्यासाठी आहे या सामाजिक बांधिलकीने रोहिदास बापू चोरघे हे गेले सात वर्ष राजगड (वेल्हे)तालुक्यात व पुणे शहरात विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबवत आहेत, त्यांना सामाजिक कामाचा अनुभव आहे, रोहिदास बापू चोरघे यांची लोकसेवेची तळमळ व चळवळ भारतीय विद्यापीठ पुणे येथे आगामी काळात लोकसेवकाच्या नेतृत्वाच्या माध्यमातून उभी राहील असे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेचे मा. सभापती व ज्येष्ठ नेते आप्पासाहेब रेणुसे यांनी केले. भारती विद्यापीठ, पुणे येथे रोहिदासबापू चोरघे यांचे युवा शेतकरी संघाच्या जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाचे मा. सभापती आप्पासाहेब रेणुसे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडले.त्याप्रसंगी ते बोलत होते. भारती विद्यापीठ परिसरात रोहिदास बापू चोरघे यांच्या माध्यमातून आदर्श नेतृत्व उभे राहील असे अप्पा रेणुसे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले,

याप्रसंगी 2000 महिलांना मोफत छत्री वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमास परिसरातील महिलांचा आणि नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाप्रसंगी हॉलीबॉल चॅम्पियन आलोक तोडकर, युवा इतिहास संशोधक पुरस्कार विजेते गणेश गोरक्ष खुटवड, सीए प्रथमेश थोरवे, सीए गणेश धिंडले यांचा विशेष सत्कार करण्यात आला,

कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांचे, सामाजिक संस्थांचे आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये शिवसेनेच्या नेत्या ममता शिवदीप लांडे शिवतारे, उद्योगपती अभय मांढरे, भोर-राजगड-मुळशीचे युवा नेते पृथ्वीराज थोपटे, युवा नेते गिरीराज तानाजी सावंत, मा. नगरसेवक विशाल तांबे, राजेंद्र शिळीमकर, संतोष फरांदे, युवराज बेलदरे, युवराज रेणुसे, बाळाभाऊ धनकवडे, वर्षाताई तापकीर, पुणे जिल्हा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रमेश बापू कोंडे ,भाजपा अध्यक्ष संदीप बेलदरे, उपाध्यक्ष अरुण राजवाडे, मा. सभापती दिनकर सरपाले, शेतकरी संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोरे ,तानाजी मांगडे, आकाश वाडघरे, विलास भणगे, मनसे नेते दिगंबर चोरघे, युवा नेते शिवाजी चोरघे, शिवराज शेंडकर, गणेश जागडे, चेतन मांगडे,संतोषअप्पा आखाडे, उद्योजक सुभाष तात्या मांगडे, उद्योजक शुभम गाडे व विविध मान्यवर तसेच भोर, वेल्हे, हवेली, मुळशी, राजगड आणि पुरंदर तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, विविध सोसायट्यांचे चेअरमन-संचालक, संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पंचक्रोशीतील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन निवेदक विठ्ठल पवार यांनी केले. त्यांच्या सुसंगत निवेदनशैलीने संपूर्ण कार्यक्रम प्रभावी ठरला. विशेष आकर्षण ठरले ते प्रसिद्ध गायक सुरेश कदम यांनी सादर केलेले रोहिदास बापू चोरघे यांच्या कार्यावर आधारित गीत.

या कार्यक्रमासाठी रोहिदास बापू चोरघे युवा मंच व युवा शेतकरी संघाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम सामाजिक एकोप्याचे, महिला सन्मानाचे आणि कार्यकर्त्यांच्या एकजुटीचे प्रतीक ठरले. या उपक्रमातून लोकसहभाग आणि नवदृष्टीतून उभा राहिलेला हा प्रयत्न भविष्यातील आदर्श प्रभाग घडवण्यास निश्चितच मोलाचा ठरणार असल्याचे दिसून आले.



> **कार्यालय नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे. महिलांना छत्री वाटप हा उपक्रम म्हणजे त्यांच्याविषयी असलेला आदर व्यक्त करण्याचा छोटासा प्रयत्न आहे. लोकसहभागातूनच खरं परिवर्तन घडू शकतं, हे या कार्यक्रमातून दिसून आलं. आगामी काळात तुमच्या शुभेच्छा व भक्कम पाठिंबा च्या माध्यमातून या भागात प्रचंड मोठ सामाजिक कामे मी उभी करतोय, येथील नागरिकांना व महिलांना रोहिदास बापू चोरघे हा अन्य कोणीही व्यक्ती नाही, तर तुमच्या कुटुंबातला सदस्य, भाऊ मुलगा आहे असे तुम्हाला वाटेल या पद्धतीने मी काम करणार आहे.**
> **- रोहिदास (बापू) चोरघे – संस्थापक अध्यक्ष, युवा शेतकरी संघ**

## थोडक्यात



### नवले शाळेत भक्ती रंगात रंगले विद्यार्थी

धायरी (आरंभ पर्व) : अवघा महाराष्ट्र विठुरायाच्या चरणी लीन होत असताना कै नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय मनपा शाळा क्रमांक २०४ बी वडगाव खुर्द चे विद्यार्थी ही विठुनामाचा गजर करत विठुचरणी लीन झाले. निमित्त होतं आषाढी एकादशी निमित्त पालखी सोहळ्याचे उत्तुंग अशी संत परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात संतनामाचा गजर करत विद्यार्थी फेर धरून विठुनामात रंगून गेले. पारंपारिक वेशभूषा करून आलेल्या विद्यार्थ्यांचा उत्साह भक्ती रसात न्हाऊन गेला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सविता मानकर यांनी विठोबा रखुमाई चे पूजन केल्यावर पालखी सोहळ्यास सुरुवात झाली. याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी, पालक व सहकारी शिक्षक भारती देशमुख, वैशाली रणधीर, कविता दराडे, प्रमिला तनपुरे, संजय हरपुडे, क्षितिजा साठे, शर्मिला करंजावणे, श्रद्धा नाडकर्णी , देवकर, बालवाडी शिक्षिका, सेवक चोरघे मामा उपस्थित होते.



### ज्ञानसाधना शाळेत पालखी सोहळा

वडगाव (आरंभ पर्व) : ज्ञानसाधना शाळेत आषाढी एकादशीच्या निमित्ताने पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थी या सोहळ्यात उत्साहाने सहभागी झाले. पारंपरिक वेशभूषा, विठू नामाचा गजर, फुगडी, रिंगण , भगव्या पताका नाचवत विद्यार्थ्यांनी वातावरण भक्तीमय केले होते. विठ्ठल-रुक्मिणी च्या वेशात आलेले विद्यार्थी सगळ्यांचे आकर्षण वेधून घेत होते. तत्पूर्वी संस्थेच्या सचिव सौ.पूनमताई चरवड यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. या सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची माहिती मिळावी आणि त्यांना धार्मिक-सांस्कृतिक परंपरांची जाणीव व्हावी या उद्देशाने हा सोहळा दरवर्षी शाळेत आयोजित करण्यात येत असल्याचे मत सौ. चरवड यांनी यावेळेस बोलताना व्यक्त केले. जाधव नगर येथील श्री साई गणेश मंदिर येथे आरती व प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका वैशाली कीजबिले, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका राजश्री बोबडे, शाळा समन्वयक नंदकिशोर गोसावी, सामाजिक कार्यकर्ते मनोज जोशी, मुगुट पासलकर,बाळासाहेब कंगले आदी मान्यवर उपस्थित होते.

### 'मी इथला भाई' काळेवाडीत रिक्षाचालकावर कोयत्याने हल्ला



पिंपरी (आरंभ पर्व) : काळेवाडी परिसरात एका तरुणाने रिक्षाचालकाच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली व पोलिसांना बोलावल्याचे सांगितल्याने संतापून त्याच्यावर ब्लेडने वार केले. तसेच कोयता काढून दहशत निर्माण केली. ही घटना ७ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास गणराज कॉलनी, आदर्शनगर, काळेवाडी येथे घडली. प्रेम ऊर्फ सोन्या बालाजी पोतदार (वय २३, रा. सांगवी) यास अटक केली. मधुकर विष्णू तमाके (५६, रा. काळेवाडी) यांनी मंगळवारी (दि. ८) याबाबत काळेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीच्या घरासमोर संशयिताने शिवीगाळ केली. पोलिसांना बोलावतो, असे सांगताच त्याने ब्लेडने फिर्यादीच्या डाव्या हनुवटीवर व कपाळावर वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर दुचाकीवर लावलेला कोयता काढून हवेत फिरवत "मी इथला भाई आहे, तुम्हाला जिवंत सोडणार नाही", अशी धमकी दिली.

# श्रीकृष्ण भक्तांनी घेतले भगवान जगन्नाथाचे दर्शन

## हरे राम हरे कृष्णा म्हणत धायरीतील जगन्नाथ यात्रा उत्साहात संपन्न





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

जगन्नाथ पुरीच्या धर्तीवर धायरीमध्ये देखील इस्कॉन व अखिल धायरी ग्रामस्थ यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात भगवान जगन्नाथ रथ यात्रा पार पडली.

प्रारंभी सकाळी भगवान् जगन्नाथ यांचे मानचिन्ह असणाऱ्या ध्वजाची विधिवत पूजा करून वाद्य वृदांच्या व मोठ्या प्रमाणात उपस्थित असलेल्या भक्तपरीवराच्या जयघोषात ध्वजारोहण करण्यात आले.

या जगन्नाथ रथयात्रेच्या निमित्त महंत श्री प्रवचन कर्ता कदम्ब कृष्ण प्रभुजी यांचे प्रवचन पार पडले. त्यामध्ये त्यांनी श्रीकृष्ण भक्तांना भक्तिमय मार्गदर्शन केले.

ह्यानंतर धारेश्वर मंदिर परिसर येथे महाआरती करण्यात आली. महाप्रसादाने या भव्य जगन्नाथ रथयात्रेची सांगता झाली. ह्या भगवान जग न्नाथ रथयात्रेमध्ये धायरी ग्रामस्थानी मोठ्या संख्येने सहभाग घेतला व भगवान् जगन्नाथ यांचे कृपा आशीर्वाद प्राप्त केले.

या र रथयात्रेचे संयोजन माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी केले. यावेळी बोलताना बापूसाहेब पोकळे यांनी श्रीकृष्ण भक्तांसाठी चालवलेल्या उपक्रमाची माहिती दिली. उपक्रमाचे यंदाचे चौथे वर्षे होते. मोठ्या संख्येने श्रीकृष्ण भक्तांनी भगवान जगन्नाथ यांचे दर्शन घेतले. भगवान जगन्नाथ यांच्यावर श्रद्धा असणाऱ्या धायरीतील भक्तगणांनी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत भगवन जगन्नाथ यांचे आशीर्वाद प्राप्त केले..

यावेळी या रथयात्रेमध्ये नांदेड सिटी पोलीस स्टेशन पी आय अतुल भोस, खडकवासला भाजपा अध्यक्ष सचिन मोरे, मंडलाध्यक्ष रुपेश जी घुले, वस्ताद सुभाष पोकळे, काकासाहेब चव्हाण, सारंग नवले, श्रीरंग चव्हाण, जयश्रीताई पोकळे,संदीप चव्हाण, देविदास रायकर, प्रमोद रायकर, दशरथ मनेरे, अनिल मते, सुमित बेनकर,अजय मते , स्वप्निल बेनकर, यांच्यासह सर्वपक्षीय मान्यवर व नागरिक कृष्णभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बंधन म्युच्युअल फंडचा 'बंधन मल्टी-फॅक्टर फंड' लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बंधन म्युच्युअल फंडने आपली नवीन ओपन-एंडेड इक्विटी योजना 'बंधन मल्टी-फॅक्टर फंड' सुरू करण्याची घोषणा केली आहे. या योजनेत एक प्रगत आणि विकसित मल्टी-फॅक्टर क्वांटिटेटिव्ह मॉडेल आधारित गुंतवणूक संकल्पना वापरली आहे. या फंडामध्ये चार वेळेवर पडताळलेले गुंतवणूक घटक – गती, मूल्य, गुणवत्ता आणि कमी अस्थिरता– एकत्रित करून गुंतवणूकदारांना विविधरूप पोर्टफोलिओ उपलब्ध करून दिला जातो. या योजनेचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) गुरुवार, १० जुलै २०२५ रोजी उघडेल आणि गुरुवार, २४ जुलै २०२५ रोजी बंद होईल. बंधन मल्टी-फॅक्टर फंडमध्ये गुंतवणूक परवाना असलेल्या सर्व म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्यूटर्समार्फत विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून किंवा थेट https://bandhanmutual.com/nfo/bandhan-multi-factor-fund/ या वेबसाइटवरून करता येईल. या नव्या योजनेबाबत बोलताना बंधन एएमसीचे सीईओ विशाल कपूर म्हणाले, 'जसजसा बाजार अधिक गतिमान आणि प्रभावी होत चालला आहे, तसतशी गुंतवणूकदारांना अशा रणनीतींची गरज आहे, जी बाजार चक्रांशी सुसंगत राहून टिकाव धरू शकतील. मल्टी-फॅक्टर गुंतवणूक ही एक प्रभावी इक्विटी गुंतवणूक रणनीती म्हणून पुढे आली आहे, विशेषतः अशा परिस्थितीत जिथे कोणताही एक घटक सर्वच वेळी आघाडीवर राहू शकत नाही. तेजीच्या बाजारात गती, पुनरुत्थानाच्या टप्प्यात मूल्य, मंदीच्या काळात गुणवत्ता आणि अनिश्चिततेत कमी अस्थिरता चांगले काम करते.

### अझीम प्रेमजी विद्यापीठाने डेव्हलपमेंट मॅनेजमेंटमध्ये

## एक्झिक्युटिव्ह एमबीएची केली घोषणा

### सामाजिक क्षेत्रासाठी व्यवस्थापन प्रतिभा तयार करण्यासाठी एक वर्षाचा पूर्णवेळ कार्यक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अझीम प्रेमजी विद्यापीठाने डेव्हलपमेंट मॅनेजमेंटमध्ये एक्झिक्युटिव्ह एमबीएची घोषणा केली आहे. हा एक वर्षाचा पूर्णवेळ पदव्युत्तर कार्यक्रम असून, विशेषतः कार्यरत व्यावसायिकांसाठी तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाची पहिला बॅच जानेवारी २०२६ पासून विद्यापीठाच्या बेंगळुरू येथील कॅम्पसमध्ये सुरू होईल. या अभ्यासक्रमासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. किमान दोन वर्षांचा अनुभव असलेल्या व्यावसायिकांना, विशेषतः सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या किंवा त्यात बदल करणाऱ्यांना, अर्ज करण्यास प्रोत्साहित केले जाते. अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०२५ आहे. हा कार्यक्रम समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नफा आणि कामगिरीच्या पलीकडे जाणाऱ्या व्यवस्थापन शिक्षणाच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देतो. पारंपारिक एमबीएच्या विपरीत, तो व्यावसायिकांना सामाजिक बदल, सार्वजनिक कल्याण आणि समावेशक विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या संस्थांमध्ये अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी सुसज्ज करतो. अभ्यासक्रमात वित्त, लोक व्यवस्थापन, प्रकल्प व्यवस्थापन आणि संघटनात्मक डिझाइन यासारख्या मुख्य व्यवस्थापन क्षमतांचे विकास पद्धतीत मजबूत आधार असलेले मिश्रण केले आहे. सहभागी असमानता, शाश्वतता आणि सार्वजनिक प्रणालींचे कार्य यासारख्या आव्हानांशी खोलवर सहभागी होतील, त्यांना भारताच्या सर्वात जटिल सामाजिक आणि आर्थिक संदर्भात प्रभावीपणे काम करण्यासाठी तयार करतील. हे कार्यक्रम वेगळे करते ते उद्देश-चालित शिक्षणासाठीची त्याची वचनबद्धता आहे. हे व्यावसायिकांना प्रामाणिकपणा, करुणा आणि सामाजिक जबाबदारीची खोल भावना असलेल्या संस्था उभारण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी प्रोत्साहित करते.

## राजगुरुनगर-वाफगाव रस्त्याची दुरावस्था

### सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर-वाफगाव रस्त्याची दुरावस्था झाली असून या मार्गावरील रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम अर्धवट पडले आहे. दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या पावसाने हा रस्ता खड्डेमय व चिखलमय झाला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी राडारोडा, खोल खड्डे व साचलेले पाणी यामुळे वाहनचालकांना अत्यंत त्रासदायक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित ठेकेदार यांच्या बेपर्वाईमुळे नागरीकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सामाजीक कार्यकर्ते अमर बोऱ्हाडे यांनी याबाबत बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार केला असून दखल न घेतल्यास, पुर्वभागातील नागरीक आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. असे बोऱ्हाडे यांनी सांगितले. या रस्त्यावर काही महिन्यांपूर्वी नुतनीकरण व रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले. मात्र, निकृष्ट दर्जाचा मातीमिश्रीत मुरूम वापरल्याने आणि काम पावसाळ्यात अपूर्ण ठेवल्याने रस्त्याची खड्डे पडून चाळण झाली आहे. मातीमिश्रित मुरूम, पाणी निचऱ्याची व्यवस्था नसल्याने चिखलमय रस्त्यावर दररोज लहानमोठे अपघात होत आहेत.

काम चालू असल्याचा कोणताही सूचनफलक लावलेला नाही. रस्त्याच्या खोदलेल्या भागाजवळ संरक्षक कठडे लावले नाहीत. घाटाजवळ काही ठिकाणी १० ते १५ फूट खोल खड्डे खोदण्यात आले असून, त्यात पावसाचे पाणी साचून तळी निर्माण झाली आहेत. रात्रीच्या वेळी या भागातून प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरत आहे. या प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभाग साफ दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या रस्त्यावरून खेड तालुक्याच्या पूर्व भागाशी दळणवळण होते. त्यामुळे शालेय वाहने, रुग्णवाहिका, एसटीबस, दैनंदिन प्रवासी सर्वांनाच याचा त्रास होत आहे. जुन्या रस्त्याच्या तुलनेत हा सुधारित रस्ताच अधिक खराब असल्याचा सूर नागरिक व्यक्त करत आहेत. संपूर्ण मार्गावर खोल खड्डे आणि चिखल झाला आहे. वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. या रस्त्यावर दुचाकीस्वारांचे घसरून होणारे अपघात यामुळे दररोजचा प्रवास जीवघेणा ठरत आहे.

### ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवारातर्फे

# आषाढी एकादशीनिमित्त आरोग्यम् धनसंपदा!

## हजारो नागरिकांनी घेतला A I तंत्रज्ञानयुक्त आरोग्य तपासणीचा लाभ



**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

आषाढी एकादशीनिमित्त ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने ६ जुलै रोजी सकाळी ९:३० पासून AI तंत्रज्ञानावर आधारित शारीरिक तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या विशेष आरोग्य शिबिराचे उद्घाटन राज्यमंत्री मा. माधुरीताई मिसाळ यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या शिबिरामध्ये विविध प्रकारच्या शारीरिक तपासण्या मोफत करण्यात आल्या. यामध्ये रक्तदाब, ECG, हेमोग्लोबिन, साखर पातळी, यांसारख्या इतरही तपासण्यांचा समावेश होता. विशेष म्हणजे या शिबिरात AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर करून अचूक व सुलभ तपासणी करण्यात आली, ज्यामुळे नागरिकांना वेळीच योग्य सल्ला मिळू शकला.

या उपक्रमाला भाविक भक्त व नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. परिसरातील अनेकांनी या सुविधेचा लाभ घेतला व आरोग्य विषयक जागरुकता वाढीस लागली.

सिंहगड रोड भागातील जनतेचा हक्काचा माणूस म्हणून ओळख असलेले माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप यांनी या आरोग्य शिबिराचे नियोजन केले त्यास हजारो नागरिकांचा लाभ मिळाला.

ह्याशिवाय ॲड.प्रसन्नदादा जगताप मित्र परिवारातर्फे फराळ सेवा ही करण्यात आली. त्यामध्येही हजारो भक्तांनी फराळाचा आस्वाद घेतला.

यावेळी बोलताना राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार यांनी राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. हजारो नागरिकांची आरोग्य तपासणी करणे हे एक मोठे पुण्याचे काम आहे. ॲड प्रसन्नदादा जगताप व मित्रपरिवार यांचे मी आभार मानते.

या आरोग्य शिबिरास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बंधू हे प्रसेनजीत फडवणीस, बाबाशेठ मिसाळ, यांच्यासह सर्वपक्षीय सर्व क्षेत्रातील विविध मान्यवरांनी भेट देऊन माहिती घेतली.

यावेळी नागरिकांनीही ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्या ह्या सामाजिक कार्याबद्दल आभार मानले.

निवडणुका येतील जातील पण जनतेसाठी झटणारा नेता हाच जनभावनेत भावतो अशी प्रचिती यानिमित्त पाहायला मिळाली...

यावेळी आयोजक ॲड. प्रसन्नदादा जगताप म्हणाले की सध्याचे जीवन हे धगधगीचे जीवन आहे. त्यामुळे अनेक व्यक्तींना काही ना काही त्रास होत असतो. अनेक तपासण्यांचे दरही जास्त आहेत. त्यामुळे आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या हेतूने यावर्षी आषाढी वारीनिम्मित हा मोफत उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये हजारो नागरिकांची तपासणी करण्यात आली. सालाबाद प्रमाणे हा उपक्रम घेण्यात आला.

जनतेच्या सेवेत कायमस्वरूपी आपण कटिबद्ध आहोत आणि राहणार आहोत. यावेळी सिंहगड रोड परिसरातील तसेच पुणे शहराच्या सर्व भागातून विठ्ठल भक्तांनी मोठी गर्दी केली.

या आरोग्य शिबिरासाठी रोहित जोशी, किशोर कुलकर्णी, भाऊसाहेब निकम,सर्वज्ञ परदेशी , यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

आरोग्यम् धनसंपदा या उपक्रमातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद यामुळे हा सोहळा अधिकच भक्तिमय झाला.



# नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना

## वाहतूक विभागाच्या बैठकीत ठोस निर्णय

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे आणि आजूबाजूच्या परिसरांतील वाढती वाहतूक कोंडी, बेशिस्त वाहनतळ, रस्त्यांवरील बेजबाबदार पार्किंग आणि अनधिकृत रिक्षा स्टॅन्ड्स यावर उपाययोजना करण्यासाठी नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत वाहतूक विभागाचे अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि स्थानिक नागरिक सहभागी झाले होते. यामध्ये विविध मार्गांवरील वाहतूक सुधारण्यासाठी, एकेरी वाहतूक, नो पार्किंग झोन आणि मार्गबदल आदींबाबत ठोस निर्णय घेण्यात आले.

या विषयाची मांडणी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी केली होती. त्यांनी चाकणकर यांच्या उपस्थितीत वाहतूक कोंडीचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर, वाहतूक विभागाच्या उपनिरीक्षक संदीप खंडागळे यांच्या नेतृत्वाखाली एक सविस्तर आढावा बैठक घेण्यात आली, ज्यामध्ये काही निर्णय घेण्यात आले.

या बैठकीस जाधवर संस्थेचे डॉ. सुधाकर जाधवर, वाहतूक उपनिरीक्षक श्री. संदीप खंडागळे, श्री. सरगर साहेब, श्री. सुरेश भाले, भूपेंद्र मोरे, प्रतिमा दांडगे, स्वप्नील कुटे, कैलास कुटे, रोहिदास जोरी, जयंत श्रोत्री, वैभव अवघडे, सुनील बर्गे, राजेश बोबडे, दीपक पाटील, भूपेश शुक्ल, मनोज कुटे, अभयसिंह साठे हे मान्यवर आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या अखेरीस, डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी जनहितार्थ काम करत असलेल्या सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांचा विशेष सत्कार केला. त्याचबरोबर, वेळ देऊन आलेल्या उपनिरीक्षक संदीप खंडागळे यांचाही सन्मान करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांनी डॉ. जाधवर यांचे सहकार्य व आयोजनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.



**"नऱ्हे-धायरी परिसरात ट्रॅफिकच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नागरिकांशी संयुक्त बैठक घेण्यात आली. यामध्ये विविध उपाययोजना ठरवण्यात आल्या असून, लवकरच प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल."**

**— API संदीप खंडागळे, वाहतूक विभाग**

**नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडी ही केवळ वाहतुकीची नव्हे, तर शिस्त, नियोजन आणि नागरिकांच्या सहकार्याची परीक्षा आहे. प्रशासनाने यावेळी ठोस पावले उचलत नागरिकांच्या सूचनांनुसार कार्यवाही सुरू केली आहे. नागरिकांनीही नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे, तरच हा उपक्रम यशस्वी होईल.**



### वाहतुकीसाठी घेण्यात आलेले निर्णय

- **जाधवर एज्युकेशन इन्स्टिट्यूट, मानाजी नगर समोरील रस्ता – फक्त दुचाकींसाठी खुला राहील.**
- **सेल्फी पॉईंट ते मानाजी नगरकडे येणारा मुख्य हायवेपासूनचा रस्ता – वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे.**
- **साताऱ्याकडून नऱ्हेगावात येणारी वाहतूक – स्वामीनारायण मंदिराच्या सर्व्हिस रोडमार्गे भुमकर चौकात आणली जाईल.**
- **नऱ्हे परिसरातून मुंबईकडे जाणारी वाहतूक – सेल्फी पॉईंट शेजारील सर्व्हिस रोडने 'राजेशाही थाट' या ठिकाणावरून मार्गक्रमण करेल.**
- **सेल्फी पॉईंट ते मानाजी नगर परिसरात – लवकरच 'नो पार्किंग' बोर्ड बसवण्यात येणार आहेत. येथे वाहने पार्किंगसाठी बंदी राहील.**
- **भुमकर चौक ते सेल्फी पॉईंट आणि झिल चौक मार्गावर – टुरिस्ट वाहने आणि इतर वाहनांचे पार्किंग बंदीस्त करण्यात येणार आहे.**
- **धायरी फाटा – नारायण सणस शाळा परिसरातील अनधिकृत रिक्षा स्टॅन्ड – तात्काळ बंद करण्यात येणार आहे.**
- **गंधर्व चौक ते पारी चौक या मार्गावर चाकणकर कॉर्नरकडून पारीकडे जाणारा कॉर्नर – वक्राकार पद्धतीने वाहनांसाठी सुरळीत केला जाणार आहे.**
- **सेल्फी पॉईंट ते राजेशाही थाट हॉटेल परिसरातील सर्व्हिस रस्ता – फक्त एकेरी वाहतुकीसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. येथे केवळ मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूकच चालेल.**
- **नवले पुलाखालील वाहतुकीसाठी दुचाकींना स्वतंत्र रस्ता देण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.**

## थोडक्यात



### वाघोली-लोहगाव रस्त्याची दुर्दशा : निष्क्रियता की उघडपणे भ्रष्टाचार?

**पुणे (आरंभ पर्व) :** 'स्मार्ट सिटी'च्या नावाखाली कोट्यवधींचा खर्च करण्यात येत असताना, प्रत्यक्षातली परिस्थिती मात्र काही आणि भयानक वास्तव काही वेगळंच सांगते. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या वाघोली परिसरातील प्रमुख निवासी संकुले — अथकज विजय विहार, प्राईमेरा होम्स आणि रोहन अभिलाषा — अजूनही मूलभूत रस्ता व ड्रेनेजसारख्या सुविधांपासून वंचित आहेत. वाघोली-लोहगाव रोड ते अग्निशमन केंद्र, अथकज विजय विहार, मोरे कॉर्नर, रोहन अभिलाषा रस्त्याची अवस्था अक्षरशः नरकयातना भासत आहे. ठिकठिकाणी चिखल, घाण, मोठाले खड्डे आणि पाण्याचे साचलेले डबके यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. लहान मुलं, वृद्ध आणि कामावर जाणाऱ्या नागरिकांसाठी हा रस्ता एक जीवघेणा प्रवास ठरत आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी वाको वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अनिल कुमार मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शन आंदोलन करण्यात आले. सर्वात दुःखद बाब म्हणजे अथकज विजय विहारमध्ये सैन्यातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि जवान वास्तव्यास आहेत, ज्यांनी देशासाठी आपलं संपूर्ण जीवन समर्पित केलं. आज त्यांना त्यांच्या स्वतःच्या शहरात अशा अवस्थेत राहावं लागत आहे हे अत्यंत लज्जास्पद आहे.

### तरुणास बेदम मारहाण प्रकरणी सात वर्षे सक्तमजुरी

- **राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल**

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** तरुणास बेदम मारहाण करीत ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्यास राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी सात वर्षे सक्तमजुरी व एक लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. आळंदी (ता.खेड) पोलिस ठाण्याच्या हद्दीत ओव्हरटेक करण्याच्या कारणावरून नोव्हेंबर २०२१ मध्ये झालेल्या वादातून २२ वर्षीय तरुणास बेदम मारहाण करीत ठार मारण्याचा प्रयत्न झाला होता. संतोष वासुदेव घुंडरे (वय ३५, रा. आळंदी, ता. खेड) असे या प्रकरणातील शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबतची माहिती अशी की, २१ नोव्हेंबर २०२१ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास गोपाळपुरा आळंदी येथे दुचाकी (एम.एच.१४, जे.के. ६९४४) वरून परमेश्वर पुरुषोत्तम अंभोरे व त्यांचा मित्र घरी येत होते. गोपाळपुरा येथे जात असताना त्यांच्या समोर एक मोटार (एम.एच. १४, एच.डी. ३९९) ही रस्त्यात मधोमध उभी होती. तिच्या समोर चारचाकी वाहने होती. दुचाकीस्वार समोरील वाहनास डाव्या बाजूने ओव्हरटेक करून जात असताना कारचालक संतोष घुंडरेने त्यांना शिवीगाळ केली. तसेच लाकडी दांडक्याने परमेश्वर अंभोरे यांना अमानुष मारहाण केली. त्यात परमेश्वर अंभोरे यांच्या नाकातून व कानातून रक्तस्त्राव झाला होता.

### जिजाबाई काळभोर यांचे निधन



**लोणी काळभोर (आरंभ पर्व) :** लोणी काळभोर येथील जिजाबाई दत्तात्रय काळभोर यांचे (वय ८७) वृद्धापकाळाने निधन झाले .त्यांच्या मागे दोन मुले , तीन मुली , जावई ,सुना , नातवंडे असा मोठा परिवार आहे ह भ प सोपानकाका दत्तात्रय काळभोर यांच्या त्या मातोश्री तर उद्योगपती शहाजी सोपान काळभोर यांच्या त्या आजी होत्या .

## वारकरी संप्रदायासाठी विशेष सन्मान योजना राबवाव्यात



- **भालचंद्र सावंत यांची मागणी**
- **आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांना अभिवादन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या भूमीतील एक जगद्विख्यात आणि सशक्त लोकआंदोलनाची ओळख आहे. ही चळवळ फक्त धार्मिक नसून ती सामाजिक न्याय, समता, आणि आत्मोद्धाराचा महामार्ग आहे. संतांच्या शिकवणुकीवर आधारित ही वारी महाराष्ट्राच्या जनतेला एकत्र बांधणारी, प्रेरणा देणारी आहे. या वारकरी संप्रदायाची विशेष सन्मान योजना राबवाव्यात," अशी मागणी राष्ट्र निर्माण दलाचे अध्यक्ष भालचंद्र सावंत यांनी केली. देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त वारकरी संप्रदायास मानाचा मुजरा करून भालचंद्र सावंत म्हणाले, "आज व उद्या पंढरपुरात लाखो वारकरी बांधव निःस्वार्थ भक्तिभावाने विठ्ठल-रखुमाईच्या चरणी नतमस्तक होत आहेत. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा हा समृद्ध ठेवा आहे. शासनाच्या वतीने वारकरी संप्रदायासाठी विशेष धोरणात्मक सन्मान योजना राबवाव्यात. वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी, सुरक्षित निवास व्यवस्था, स्वच्छता आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा.""आजच्या काळात जात, धर्म, भाषा, पंथ याच्या पलीकडे जाऊन वारकरी बंधू-भगिनी विठुरायाच्या नामस्मरणात एकत्र येतात, ते खरे परिवर्तनाचे मूळ आहेत.

## विवाहामध्ये होणारी फसवणूक थांबवावी



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

मराठा समाजातील विवाह मध्ये होणारी फसवणूक थांबविण्यासाठी नागरिकांनी जागृत राहणे गरजेचे असल्याचे मत सकळ मराठा समाजाचे नेते उत्तम कामठे यांनी व्यक्त केले . हडपसर येथे सकल मराठा समाज, हडपसर ,हवेली तालुक्यातील नागरिकांची महत्वपूर्ण बैठक आयोजीत करण्यात आली होती .यात मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव उपस्थित होते .

यावेळी बोलताना कामठे यांनी सांगितले की आपण विवाह विषयी जागृतीसाठी एक कमिटी स्थापन करु .मुला ,मुलींचे विवाह ठरविताना होणारी फसवणूक टाळावी ,पुर्ण शहानिशा करुन लग्न ठरविणे ,कायदे विषयी मार्गदर्शन घेणे, पोलीस प्रशासनांची मदत घेणे ,लग्नात लागणारे साहित्या साठी मराठा उदयोजक तयार करणे ,कुणबी दाखल्याची अमंलबजावणी करणे ,युवक सक्षम झाला तर विवाह सुलभ पद्धतीने होईल .अश्या प्रकारचे ठराव यात मांडण्यात आले .यावेळी मराठा समाजाने विवाह विषयी केलेली आचारसंहिता वाचून दाखवण्यात आली. समाजात हुंडाबळी जाऊ नये म्हणून विविध २२मुद्दे या आचारसंहितेत घेतले आहेत .यामध्ये लग्नकार्याचे सर्व कार्यक्रम एकाच दिवशी घेण्यात यावे, बुफे पद्धत बंद करावी त्यामुळे अन्न वाया जाण्याचे प्रमाण थांबेल ,स्टेजवर पुढाऱ्यांची गर्दी कमी करावी. लग्न वेळेवर लावून सर्वांची वेळेची बचत करावी. जर पुढारी लोकांनी ठरवले की वेळेच्या नंतर लग्न लागण्यास उशीर झाला तर आम्ही थांबणार नाही तो पुढाऱ्यांचा मोठेपणा ठरेल .

प्री वेडींग अजिबात करू नये कारण त्यामुळे प्री-वेडिंगच्या नावाखाली बाहेर गावी जाऊन अनेक चाळे होत असल्यामुळे लग्न मोडण्याचे प्रमाण वाढले आहेत . लग्नाचा खर्च मुलांच्या शिक्षणासाठी किंवा त्यांच्या व्यवसायाच्या भांडवलासाठी करावा . नवरा नवरीला आशीर्वाद देण्यासाठी समाजातील एका ज्येष्ठ व्यक्तीला सांगावे .ज्या कुटुंबाची पार्श्वभूमी सुनेचा हुंडा किंवा काही कारणास्तव छळ होत असेल तर अशा कुटुंबाशी संबंध होणार नाही याची काळजी घ्यावी. सासरी होणाऱ्या अन्यायाबद्दल मुलीच्या पुढील जीवन सुसह्य होण्यासाठी माहेरच्या लोकांनी पुढाकार घ्यावा .

मराठा समाजातील लोक घेऊन एक कमिटी तयार करून तिचे कार्य चालू करावे मंगळ कार्यालयाच्या बाहेर मराठा समाजाची आचारसंहिता लावावी जेणे करुन तिचे पालन होईल पन्नास लग्न कार्यापैकी दहा जणांनी जरी आचारसंहितेचे पालन केले तरी ती मराठा समाजाची एक चांगली सुरुवात होईल .

यावेळी उत्तम कामठे, दत्तात्रय जवळकर, वाय .जी .पवार दत्तात्रय जाधव, रघुवीर तुपे, अनिरुद्ध मराठे, सचिन सुंबे, गजानन जगताप, निखिल झेंडे, साहेबराव खामकर, स्मिता धुमाळ, शिवाजी पवार, सुलभा साळुंखे, जयश्री पवार ,अनिल भापकर, सुनिता तुपे, हनुमंत तुपे आदी मराठा बांधव उपस्थित होते.

# सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहीर

## इच्छुकांना नव्याने संधी



**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील १६२ पैकी १०३ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत येथील खेड पंचायत समितीच्या राजा शिवछत्रपती सभागृहात घेण्यात आली. यात अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील २३ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात आलेले ४१ ग्रामपंचायतींचे आरक्षण कायम राहिले. तर सर्वसाधारण आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग गटातील पूर्वीच्या आरक्षणात बदल झाला आहे. आधी संधी येऊन दुरावली गेल्याने अनेकांच्या अपेक्षांवर पाणी पडले, तर ज्यांना अपेक्षित नव्हते अशा इच्छुकांना नव्याने संधी मिळाली आहे. सन २०२५ ते २०३० या कालावधीत निवडणुक होणा-या १४४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या अध्यक्षतेखाली २३ एप्रिलला झाली होती. मात्र, त्यानंतर नागरिकांच्या मागास प्रवर्ग गटातील आरक्षण टक्केवारीत बदल करून पुन्हा आरक्षण सोडत घेण्याचे न्यायालयाने निर्देश दिले, त्यानुसार तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या मार्गदर्शनाखाली खेड पंचायत समितीच्या सभागृहात पुन्हा आरक्षण काढण्यात आले. ओबीसी आणि सर्वसाधारण प्रवर्गातील सर्वसाधारण आणि महीला राखीवसाठी सोडत घेण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार राम बीजे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्यांद्वारे आरक्षण काढण्यात आले. काही निवडक गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व त्यांचे समर्थक आरक्षण सोडतीला उपस्थित होते.

सरपंचपदासाठी महिलांना ५० टक्के आरक्षण असताना देखील आरक्षण सोडतीसाठी केवळ दोनच महिला उपस्थित होत्या.

जाहीर करण्यात आलेले आरक्षण पुढीलप्रमाणे - अनुसूचित जमाती महिला - आव्हाट, खरपूड, कुडे बुद्रुक, घोटवडी, टोकावडे, धामणगाव खुर्द, धुवोली, नायफड, परसुल, भोरगिरी, शेंदुर्ली, आंभु, मिरजेवाडी, दावडी, गारगोटवाडी, खरपुडी खुर्द, औंढे.

अनुसूचित जमाती - एकलहरे, खरोशी, गोलेगाव, डेहणे, भोमाळे, मोरोशी, वांद्रा, शिरगाव, साकुर्डी, सुरकुंडी, दराकवाडी, नाणेकरवाडी, तुकाईवाडी, अहिरे, आडगाव.

अनुसूचित जाती महिला - निघोजे, मरकळ, शिंदे, चास, सुपे.

अनुसूचित जाती - वहागाव, कळमोडी, चिखलगाव, तिफणवाडी.

नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गातील आरक्षण -

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला - कोयाळी तर्फे वाडा, कान्हेवाडी बुद्रुक, जऊळके बुद्रुक, शिरोली, वाकी खुर्द, शिवे, रासे, सातकरस्थळ, भोसे, वाजवणे, मेदनकरवाडी, वरची भांबुरवाडी, साबळेवाडी, चिचबाईवाडी, कान्हेवाडी तर्फे चाकण, कुरकुंडी, दौंडकरवाडी.

नागरिकांचा मागास प्रवर्ग - रोहकल, वाडा, निमगाव, भांबोली, हेद्दज, चांडोली, कनेरसर, कडधे, पिंपरी बुद्रुक, बीरदवडी, देवोशी, करंजविहिरे, वरुडे, सांडभोरवाडी, मोई.

सर्वसाधारण महिला - आसखेड खुर्द, वराळे, वाकळवाडी, औदर, सावरदरी, गोसासी, रानमळा, दोंदे, शेलू, कमान, वाळद, वडगाव पाटोळे, सांगुर्डी, गोणवडी, धानोरे, होलेवाडी, गोलेगाव, पिंपळगाव, येणीये बुद्रुक, चिंचोशी, वाफगाव, पिंपळगाव तर्फे खेड, कोयाळी तर्फे चाकण, पाडळी, चांदुस सिद्धेगव्हाण, किवळे, देशमुखवाडी, पापळवाडी, वाकी बुद्रुक, खरपुडी बुद्रुक, ढोरेभांबूरवाडी, गडद, कडूस, तोरणे बुद्रुक, जैदवाडी, कोहिनकरवाडी.

सर्वसाधारण -साबुर्डी, बीबी, बहिरवाडी, वेताळे, येणीये खुर्द, तळवडे, वाघू, मोहकल, वि-हाम, कोळीये, वासुली, रेटवडी, कोरेगाव खुर्द, पाळू, महाळुंगे, पांगरी, केळगाव, चिंबळी, कुरुळी, अनावळे, शेलगाव, काळुस, बहुळ, टाकळकरवाडी, मांजरेवाडी, आंबोली, आखरवाडी, राक्षेवाडी, संतोषनगर, कोरेगाव बुद्रुक, पूर, कुडे खुर्द, येलवाडी, च-होली खुर्द, गाडकवाडी.

गुंतागुंतीच्या लॅमिनेक्टोमी प्रक्रियेद्वारे मणक्यातील दुर्मिळ ट्युमर काढून टाकण्यात

# नोबल हॉस्पिटल्समधील डॉक्टरांना यश

- **प्रक्रियेमुळे आयटी अभियंत्याची तीव्र पाठीच्या दुखण्यातून सुटका**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नोबल हॉस्पिटल्समधील डॉक्टरांच्या टीमने आयटी अभियंता असलेल्या एका 38 वर्षीय महिलेच्या मणक्यात निर्माण झालेला दुर्मिळ ट्युमर लॅमिनेक्टोमी अॅन्ड डीकॉम्प्रेशन ऑफ कॉर्ड या प्रक्रियेद्वारे काढण्यात यश मिळवले. या टीमचे नेतृत्व नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर येथील स्पाईन सर्जन डॉ.विशाल चौधरी यांनी केले.या ट्युमरच्या ठिकाणामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती. सहा महिन्यापासून तीव्र वेदना होत असलेल्या या महिला रूग्णाला यातून सुटका मिळाली असून आता पुन्हा कामावर जाण्यास सज्ज झाली आहे.

याविषयी माहिती देताना नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर येथील स्पाईन सर्जन डॉ.विशाल चौधरी म्हणाले की,सहा महिन्यापूर्वी या महिला अभियंत्या आमच्या ओपीडीमध्ये आल्या होत्या.तेव्हा सातत्याने होत असलेल्या तीव्र पाठीच्या वेदनांनी त्या ग्रस्त होत्या. पाठीतील वेदना या कुठल्याही कामकाजानंतर नव्हे तर रात्री झोपेत किंवा कुठल्याही वेळी उद्भवत असायच्या. त्यानंतर त्यांनी इतर ठिकाणी औषधे व फिजिओथेरपी द्वारे यासाठी उपचार घेण्याचा प्रयत्न केला,परंतु वेदना कमी झाल्या नाहीत. अशा प्रकारची लक्षणे लक्षात घेता मणक्याचा एमआरआय करण्याचे आम्ही ठरवले.त्यामध्ये पाठीच्या कण्याच्या मध्यभागी ट्युमर असल्याचे आढळून आले,याला टेराटोमा ऑफ कॉर्ड अॅट डी9 लेव्हल असे म्हणतात.

(पाठीच्या कण्यात निर्माण झालेल्या टेराटोमा ऑफ कॉर्ड अॅट डी9 लेव्हल हा जंतूपेशींपासून निर्माण होणारा एक दुर्मिळ ट्युमर आहे.हा ट्युमर सामान्यत: पाठीच्या कण्यातील किंवा आजूबाजूच्या उतींमध्ये आढळतो.या ट्युमरचे निदान सहसा एमआरआय किंवा हिस्टोलॉजिकल तपासण्या (पेशींची मायक्रोस्कोपिक तपासणी) याद्वारे केली जाते. उपचारांमध्ये बहुतांशवेळा ट्युमर काढून टाकण्यासाठी आणि पाठीचा कण्यावरील दाब काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रिया केली जाते)

अशा प्रकारचे ट्युमर हे दुर्मिळ असतात.जर याचे निदान वेळेवर केले गेले नाही तर पायातील ताकद कमी होऊ शकते आणि मणक्याचे कायमचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आम्ही लॅमिनेक्टोमी अॅन्ड डीकॉम्प्रेशन ऑफ कॉर्ड प्रक्रिया करायचे ठरवले असे डॉ.चौधरी म्हणाले.पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी या प्रक्रियेच्या महत्त्वाबाबत रूग्णाचे समुपदेशन करण्यात आले.

लॅमिनेक्टोमी प्रक्रियेमध्ये पाठीच्या कण्यावर किंवा नसांवर येणारा दाब कमी करण्यासाठी कशेरूकाच्या हाडाचा एक भाग (लॅमिना) काढून टाकण्यात येतो.

**दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.**
**संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com**

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.